स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विज्ञान शाखेअंतर्गत “**राज्यशास्त्र** " विषयातील (पीएच.डी)

पदवीकरता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

"कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव"

संशोधक

विशाल आनंदराव वाहेवळ

एम.ए ,सेट (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. अविनाश पांचाळ

सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक,

राज्यशास्त्र विभाग,

शारदा कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

राज्यशास्त्र विभाग,

ज्ञानोपासक शिक्षण मंडळ,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

सप्टेंबर 2023

01	प्रास्ताविक	
02	संशोधन विषयाची आवश्यकता	
03	संशोधनाचे महत्त्व	
04	संशोधनाचे समस्यासुत्रण	
05	संशोधनाची उद्‌दिष्ट	
06	संशोधनाची गृहीतके	
07	पूर्व संशोधनाचा आढावा	
08	संशोधनाची पद्‌धती	
09	संशोधनाचा आराखडा	
10	संशोधनातची मुलाखत	
11	संशोधनाची मर्यादा	
12	प्रकरणाची रूपरेषा	
13	संदर्भसूची	

“कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव”

प्रास्ताविक :-

आज भारत विविधतेने नटलेल्या हजारो वेगवेगळ्या जाती-धर्मांना सामावून घेऊन एकसंघपणे त्याची पंचाहत्तरी पार करत आहे, याची श्रेय द्यावे लागेल ते भारतात असलेल्या लोकशाही,संविधानवादी मूल्यांना. भारतासोबत स्वातंत्र्य झालेल्या अनेक देशांमध्ये आजतागायत अनेक वेळा लोकशाहीवर कुरघोडी करून लष्करी सत्ता, हुकूमशाही, एकाधिकारशाही आल्याचे दिसते. भारतीय संविधानामध्ये अंतर्भूत असलेले लोकशाहीची मूल्य भारतीय जनमानसात रुजवण्याचे विचार अनेक थोर भारतीय राजकीय पुढाऱ्यांनी मांडले. त्यामध्ये मान्यवर कांशीराम यांचे नाव आदराने घेतले जाते. कांशीरामने '**जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी**' हे आपल्या चुनावी नाऱ्या मधून लोकशाहीचा खरा संदेश दिला. लोकसंख्येनुसार प्रत्येक समाजास प्रतिनिधित्व असावे, असे कांशीराम ह्यांचे मत होते. कांशीराम यांच्यावर बुद्ध, नारायण गुरु , छत्रपती शाहू महाराज , महात्मा ज्योतिबा फुले,डॉ. भीमराव आंबेडकर, पेरियर रामास्वामी नायकर त्यांच्या विचाराचा मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. त्या माध्यमातून त्यांनी 6000 पेक्षा जास्त वेगवेगळ्या जातीत विभागलेल्या बहुजन समाजाला एकसंघ बांधण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले.

मान्यवर कांशीराम यांच्यावर डॉ .आंबेडकरांच्या खालील दोन पुस्तकांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव होता त्या माध्यमातून त्यांचे व्यक्तिमत्व घडले

१) *Annihilation of cast*

२) *What Gandhi and the Congress have done to the untouchable*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर भारतातील बहुजन चळवळीमध्ये चेतना निर्माण करून ८५% बहुजनांचे आपल्या विचारातून संघटन करण्याचे कार्य मान्यवर कांशीराम यांनी केले. त्यांनी बामसेफ, डी.एस फोर संघटनेच्या माध्यमातून आपल्या सामाजिक जीवनास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळामध्ये कांशीराम यांनी पुणे येथे नोकरीला असताना आठ वर्ष आर.पी.आय मध्ये काम केले . परंतु आर.पी.आय आणि काँग्रेसमध्ये झालेल्या अन्यायकारक जागा वाटपावरून कांशीराम यांनी आर.पी.आय पासून स्वतःची फारकत करून घेतली. पुढे त्यांनी डी.एस.फोर व बामसेफ संघटनेच्या माध्यमातून स्वतःचे सामाजिक कार्य चालू ठेवले.

मा. कांशीराम यांनी १४ एप्रिल १९८४ साली बहुजन समाज पार्टीची स्थापना केली आणि अवघ्या दहा वर्षात १९९५ ल भारतीय जनता पार्टीच्या मदतीने कु. मायावतीस उत्तर प्रदेश ची पहिली दलित महिला मुख्यमंत्री बनवले ."**जो जमीन सरकारी है वो जमीन हमारी है**" हा नारा देऊन भूमिहीनासाठी जमीन हक्कासाठी लढे उभारले आणि मायावती मुख्यमंत्री झाल्यानंतर भूमिहिनांना जमिनीच्या मालकी हक्क दिला.

१० व्या आणि ११ व्या लोकसभेचे सदस्य म्हणून त्यांची संसदेतील भाषणे त्यांना एक उत्तम संसदपटू म्हणून दर्शवतात. अशा मूलगामी मान्यवर कांशीरामांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करण्यासाठी मी हा संशोधनाचा विषय निवडलेला आहे. अभ्यासाअंती मला खात्री वाटते की,वर्तमानकाळातील आणि भविष्यातील राजकीय प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी मान्यवर कांशीराम यांचे राजकीय विचार व कार्य मार्गदर्शक ठरेल.

संशोधन विषयाची आवश्यकता (Importance of the Study):-

`कांशीरामां यांचे राजकीय विचार आणि त्यांचा भारतीय राजकारणावर प्रभाव’ या संशोधन विषयाच्या अभ्यासाला सुरुवात करण्यापूर्वी या अभ्यासाची गरज प्रतिपादन करणे आवश्यक आहे. भारताच्या सामाजिक, राजकीय, भौगोलिक पार्श्वभूमीचा अभ्यास करून भारताच्या सध्याच्या राजकीय स्थिती, राजकारणाकडे पाहत असताना भारताच्या राजकारणाला नवीन आयाम देण्यात कांशीराम यांचे कार्य उल्लेखनीय आहे, असे दिसून येते . आजच्या वर्तमान काळात आणि उद्याच्या भविष्यकाळातही भेडसावत असलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नावर उपाययोजना करायच्या असतील तर सखोल आणि मुलगामी असे **'कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव**' या विषयावर आधारित संशोधनाची आवश्यकता आहे. तथापि अनेक विषयांना स्पर्श करून या संशोधनाची आवश्यकता पूर्ण करणे हा माझा मानस आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व (Significance of the Study) :-

प्रस्तुत शोध प्रबंध **'कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव** ' या विषयाच्या अनुषंगाने संशोधन विषयाचे महत्त्व विशद करत असताना मान्यवर कांशीराम यांनी केलेले राजकीय कार्य महत्त्वाचे आहे. 1984ला बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. बसपा प्रमुख असताना मा.कांशीरामने 'जिसकी जितनी संख्या भारी उसकी इतनी भागीदारी' हा नारा देऊन भारतीय राजकारणाला नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला. बसपा प्रमुख म्हणून भारताच्या विविध राज्यात पक्षाला उल्लेखनीय यश मिळवून देऊन २५ नोव्हेंबर १९९७ ला बहुजन समाज पार्टी पक्षाला राष्ट्रीय दर्जा प्राप्त करून दिला.राष्ट्रीय पक्षाचे प्रमुख तसेच संसद सदस्य म्हणून त्यांनी केलेले कार्य व मांडलेले विचार उल्लेखनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर आंबेडकरी चळवळीची व्याप्ती वाढवून तिला भारतव्यापी करून बहुजन समाजामध्ये राजकीय आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न कांशीराम यांनी केला.

राजकीय चिंतनातून आधुनिक राजकीय स्थिती, लोकशाही पुढील आव्हाने व उपाय या संबंधाने हे अध्ययन महत्त्वाचे ठरेल. देशाच्या राजकारणात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उच्च शिक्षणातील अनेक मान्यवरांना हा शोध प्रबंध निश्चितच मार्गदर्शक ठरेल. म्हणून संशोधन विषयाचे महत्त्व विशद करत असताना त्यांच्या राजकीय विचारांचा व त्याचा भारतीय

राजकारणावरील परिणामाचा अभ्यास करून वस्तुनिष्ठ संशोधन करणे हे संशोधन विषयाचे महत्त्व आहे.

संशोधनाचे समस्यासुत्रण :-

कांशीराम यांचे राजकीय सामाजिक समतेचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कार्यामुळे भारतीय राजकारणाचे चित्र बदलले आहे भारतीय समाजातील अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक प्रवर्गातील म्हणजेच बहुजन समाजातील व्यक्तीमध्ये राजकीय आत्मविश्वास निर्माण झाला आहे. भारतीय राजकारणाच्या विकासात आणि त्याला नवीन आयाम देण्यात कांशीराम यांच्या विचाराचा सिंहाचा वाटा आहे, असे म्हटले जाते. परंतु कांशीराम यांच्या विचारामुळे दलित बहुजन समाज खरंच एकसंघ झाला आहे का ?

कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा खरच भारतीय राजकारणावर प्रभाव पडला आहे का? बहुजन समाजातील नोकरदार वर्गाचे संघटन अश्या सामाजिक चळवळीपासून ते राजकीय पक्षाची स्थापना हा त्यांचा प्रवास यशस्वी झाला आहे का ? कांशीराम यांनी भारतातील विविध घटक राज्यात भाजप,कॉंग्रेस,समाजवादी पार्टी ,तसेच इतर अनेक प्रादेशिक पक्षांसोबत केलेल्या गटबंधन राजकारणालाचा बसपाला फायदा झाला आहे का ? की बसपाची विश्वासार्हता कमी झाली ?

कांशीराम यांच्या कार्याची योग्य दखल घेतली गेली आहे का?

कांशीराम ह्यांच्या राजकीय विचारांनी सध्याचे राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी मदत होईल का?

कांशीराम यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन भारतातील अनेक राज्यांमध्ये नवीन राजकीय पक्षांची निर्मिती झाली आहे त्याचा भारतीय राजकारणावर कसा प्रभाव पडला आहे ?

अशा विविध प्रश्नांची उकल करण्यासाठी मी ‘कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव’ हा विषय निवडला आहे. त्या अनुषंगाने या विषयाचा राजकीय अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research):-

कोणताही संशोधक हा एखादा विषय संशोधनासाठी निवडून त्या विषयावर चिंतन करतो या चिंतनातून उदयाला येणाऱ्या विचारांची मांडणी हे संशोधनाची उद्दिष्टे होत याच अनुषंगाने माझ्या शोध प्रबंधाचा विषय ' कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव ' या विषयावर आधारित संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१)कांशीराम यांच्या राजकीय वैचारिक जडणघडणीवर पडलेल्या विचारांचा व परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) भारताच्या राजकीय विचारसरणीत कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

३) कांशीराम यांचा आरपीआय पासून ते बसपापर्यंतच्या राजकीय प्रवास सोबतच बामसेफ, डी एस फोर या सामाजिक संघटनांच कार्य व त्याचा भारतीय राजकारणावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४) कांशीराम यांच्या बसपा च्या संघटनात्मक बांधणी चा अभ्यास करणे.

५) बहुजन समाज पक्षाने निवडणूक काळात दिलेल्या लोकप्रिय निवडूक नाऱ्यांचा अभ्यास करणे.

६) संसद सदस्य असताना कांशीराम यांनी संसदेत केलेल्या भाषणाचा चिकित्सक अभ्यास करणे.

७) कांशीराम यांच्या जमीन हक्क विषयक लढ्याचा अभ्यास करणे.

८) कांशीराम यांनी चमचा युगाच्या माध्यमातून पुणे करारावर मांडलेली मते आणि राजकीय आरक्षणावर त्यांचा दृष्टिकोन याचा चिकित्सक अभ्यास करणे.

९) बहुजन समाज पक्षाचे प्रमुख म्हणून कार्य करताना भारतातील विविध राज्यांमध्ये ब.स.पा.च्या युती-आघाडीच्या राजकारणाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके (Hypothesis of Research):-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके लक्षात घेतली आहेत.

१) भारतीय राजकारणात कांशीराम यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

२) कांशीराम यांचा भारतीय राजकारणावर प्रभाव पडलेला आहे.

३) कांशीराम यांच्या राजकीय कार्यात त्यांनी निर्माण केलेल्या बामसेफ डी.एस.फोर याच्या विचारांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

४) आंबेडकरानंतर कांशीरामने राजकीय सुधारणांच्या माध्यमातून पुरोगामी विचारांची पेरणी केली.

५) कांशीराम यांनी बहुजनांमध्ये नवे राजकीय नेतृत्व निर्माण केले.

६) कांशीराम यांचे संसदेतील विचार भारतीय संविधान लोकशाही आणि जनहिताच्या कार्याला मजबूत करणारे आहे. त्यांनी सामाजिक हिताच्या दृष्टिकोनातून सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेल्या प्रश्नाची दखल शासनास घ्यावी लागली.

७) समाज व्यवस्था उभारणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारे दलित, वंचित,शेतकरी, कामगार भूमिहीन,शेतमजूर इत्यादींचे प्रश्न सोडवण्यासाठी कांशीराम ह्यांचे विचार सतत मार्गदर्शक राहिले आहेत.

संशोधन पद्धती (Research Methodology):-

प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या उद्देशानुसार प्राथमिक आणि द्वितीय तथ्यांचा (साधनांचा)वापर आवश्यक असल्यामुळे संशोधनात दोन्ही साधनांचा वापर करण्यात येणार असून त्याचे तथ्य संकलन केले जाणार आहे.

प्राथमिक साधनांच्या संकलनासाठी मुलाखत,अनुसूची,प्रत्यक्ष निरीक्षण इत्यादींचा वापर करून संशोधनासाठी ची आवश्यक माहिती मिळविली जाईल.

देशभरातील काशीराम सोबत काम केलेल्या विविध व्यक्तींच्या प्रत्यक्ष मुलाखत, कांशीराम यांचे लिखाण, त्यांची संसदीय भाषणे, त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन निर्माण झालेल्या देशातील विविध राजकीय पक्षांच्या वरच्या फळीतील किंवा प्रमुख नेतृत्वाच्या मुलाखती प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून सुद्धा माहितीचे संकलन केले जाईल.

कांशीराम -बसपा संदर्भात विविध अहवाल ,संदर्भ ग्रंथ, प्रकाशित-अप्रकाशित शोध प्रबंध, संशोधन साहित्य, ज्ञानकोश,नियतकालिके,वृत्तपत्रे,साहित्य,मासिके,पक्षाचे अधिकृत संकेतस्थळ, इंटरनेट विविध पत्रके पक्षाच्या बैठक अहवाल, पक्षप्रमुखांनी लिहिलेले साहित्य संपदा, निवडणूक आयोगाचे अहवाल, संशोधक लेखकाचे लेखन, विचारवंताचे लेखन ह्यासारखे अन्य विश्वासनीय स्त्रोताकडून माहिती संकलन अशा दुय्यम स्त्रोताकडून माहिती संकलन केली जाईल.

संशोधनाचा आराखडा (Research Design):-

प्रस्तुत संशोधन आराखडा मांडत असताना वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरला जाईल . ज्यावेळी संशोधन कार्याचा उद्देश व्यक्ती किंवा प्रादेशिक भूभागाची वैशिष्ट्ये व लक्षणे सविस्तरपणे वर्णन करणे हा असतो,तेव्हा अशा स्वरूपाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा उपयुक्त ठरतो.

संशोधन मुलाखती :-

राजकीय दृष्टिकोनातून कोणत्याही घटनेची माहिती घेत असताना वस्तुनिष्ठता महत्वाची असते त्याच दृष्टिकोनाने संशोधनाचा एक भाग प्रश्नावलीच्या आधारे, कांशीराम यांचे समकालीन सहकारी, बसपा-बामसेफ संबंधितांच्या तसेच त्यांच्या विचाराने प्रभावीत होऊन स्थापन झालेल्या पक्षाच्या प्रमुखाच्या किंवा वरच्या फळीतील नेत्याच्या मुलाखती घेऊन व या मुलाखती मधून विषयाच्या अनुषंगाने मिळणारी माहिती उपयोगी पडत असते.

संशोधन मर्यादा :-

'कांशीराम यांच्या राजकीय विचारांचा भारतीय राजकारणावर प्रभाव' हा विषय संशोधनासाठी निवडत असताना कांशीराम यांच्या राजकीय विचार व त्यांच्या भारतीय राजकारणावर परिणाम बाबत काम करत असताना काही मर्यादा येतात. प्रस्तुत प्रबंध लेखनासाठी निवडलेल्या विषयाची मर्यादा लक्षात घेता कांशीराम यांचे सामाजिक आणि राजकीय विचारांचा

अभ्यास याचाच फक्त आढावा संबंधित संशोधनात घेण्यात येणार आहे . तत्कालीन परिस्थितीतील इतर समविचारी व्यक्तींचा अथवा तत्कालीन विचारधारांचा सामाजिक व राजकीय विचारांचा आढावा घेणे आवश्यक वाटले, तर तो संदर्भ विचारात घेतला जाईल तरीही प्रबंध विषयाची मर्यादा ही मान्यवर कांशीराम यांचे राजकीय विचार आणि त्याचा भारतीय राजकारणावर परिणाम एवढीच मर्यादित ठेवण्यात आली आहे.

वरील विषयाच्या प्रबंध मांडणीत जर संदर्भयुक्त अशा विस्ताराची गरज भासल्यास विषयाला अनुसरून काही अंशी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रकरण पहिले : कांशीराम यांचे जीवन चरित्र व व्यक्तिमत्व

या प्रकरणात कांशीराम यांच्या जीवन कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. कांशीराम यांचे कार्य संपूर्ण भारतभर पसरलेले आहे परंतु त्यांनी उत्तर भारताला आपली कर्मभूमी मानले. त्यांचा जन्म 15 मार्च 1934 रोजी पंजाब मधील रोपड (रुपनगर) जिल्ह्यातील खवासपुर येथे झाला. यांची आई चांभार तर वडील रामदासिया होते. शिखांसोबत लग्न झाल्यामुळे कांशीराम यांची आई ही बिषण कौर बनली. त्यांचे वडील सरदार हरीसिंग शेतकी व्यवसाय करत. कांशीराम यांना तीन बहिणी आणि दोन भाऊ होते. काशीराम यांच्या नावासमोर सिंह लावले जात नाही. कारण त्यांच्या आईने त्यांचे नाव गुरुद्वारात न ठेवता त्यांच्या माहेरी 'बुंगासाहेब' ह्या घरातच ठेवले होते. कांशीराम हे लहानपणापासून जिद्दी आणि बंधने झुंगारून देणाऱ्या वृत्तीचे होते . त्यानी लहानपणी आपले केस कापले आणि पुन्हा जन्मभर कधीच केस राखले नाहीत.

कांशीराम यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण सरकारी प्राथमिक स्कूल, मलकापूर येथे झाले. पाचवी ते आठवी पर्यंतचे शिक्षण इस्लामिया स्कूल रोपड झाले तर महाविद्यालयीन शिक्षण बीएस.सी गव्हर्नमेंट कॉलेज रोपड मध्ये पूर्ण केले. 1956 ला उच्च शिक्षण व प्रशिक्षणासाठी कांशीराम देहरादून ला आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वानानंतर त्यांचा रूम पार्टनर परसराम ग्यानी ओक्साबोक्सी रडत होता, येथे त्यांना वयाच्या 22 व्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यां व्यक्तित्वाचा पहिल्यांदा परिचय झाला. प्रशिक्षणानंतर १९५८ ला कांशीराम पुण्यात नोकरीसाठी आले.पुणे येथे नोकरी करत असताना कांशीराम डॉ. आंबेडकर आणि बुद्ध जयंतीच्या सुट्टीसाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला येथूनच त्यांचा सामाजिक चळवळीत प्रवेश झाला.

कांशीराम यांनी आजन्म अविवाहित राहून स्वतःचे जीवन परिवारास नव्हे तर संपूर्ण समाजाकरिता समर्पित केले. पुढे त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन बामसेफ, डि. एस.फोर संघटनेच्या माध्यमातून बहुजनांचे संघटन उभारले. या त्यांच्या जीवनकार्याचा अभ्यास या प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे: कांशीराम यांच्या विचारांना प्रभावित करणारे घटक व व्यक्ती -

महात्मा फुले,छत्रपती राजर्षी शाहू महाराज, पेरियार इ.व्ही. रामस्वामी नायकर, नारायणा गुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा कांशीराम ह्यांच्यावर प्रभाव होता. महात्मा फुले यांचे ब्राम्हणेत्तर सत्यशोधक तत्वज्ञान व स्त्री शिक्षण याचा कांशीराम यांच्यावर मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज यांनी लागू केलेले आरक्षण धोरण तसेच समाजातील वंचित घटकांसाठी उभारलेली शाळा,वसतिगृह,हॉटेल, त्यांचे शैक्षणिक धोरण याचा कांशीराम यांच्यावर प्रभाव होता. पीरियर ई.व्ही.रामास्वामी नायकर यांनी वायाकोम सत्याग्रह, स्वाभिमानी चळवळ अशा विविध मार्गाने ब्राह्मणी धर्मास विरोध करून समाजात समतेचे तत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांनी चालू केलेल्या सामाजिक कार्यासारखे सामजिक व शैक्षणिक कार्य नारायणा गुरु यांनी केरळमध्ये चालू केले. कांशीराम यांच्या विचारावर तसेच संपूर्ण जीवन कार्यावर डॉ. आंबेडकरांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. डॉ बाबासाहेबांनी लिहिलेल्या 'अंनिहीलेशन ऑफ कास्ट ' ह्या पुस्तकाने कांशीराम ह्यांचे जीवन बदलून गेले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर , पेरियार यांना कॉंग्रेसने दिलेली वागणूक याचा कांशीराम यांच्या कॉंग्रेस विषयी विचारावर मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. पेरियार,आंबेडकर यांनी ज्याप्रमाणे वृत्तपत्राचा वापर आपले विचार समाजापर्यंत पोहोचण्यासाठी केला त्याचप्रमाणे कांशीराम यांनी सुद्धा केला.

प्रकरण तिसरे: कांशीराम यांचे राजकीय विचार व संघटन -

कांशीराम यांनी देशातील 85% बहुजन समाजाचे संघटन निर्माण केले. कांशीराम यांना उत्तम संघटक म्हणून ओळखल्या जाते. 1978 साली `बामसेफ` कर्मचारी संघटनेची स्थापना केली. त्यानंतर 1981 साली `दलित शोषित समाज संघ` म्हणजेच डी.एस.फोर ची स्थापना केली. सायकल रॅली, नुक्कड सभा, प्रत्यक्ष जनतेत वावर, केडर कॅम्प माध्यमातून मजबूत संघटन निर्माण केले. आंबेडकर जयंतीच्या दिवशी १४ एप्रिल १९८४ ला बहुजन समाज पार्टीची स्थापना केली. उत्तर भारतातील मोठ्या प्रमाणात संघटनाच्या माध्यमातून काही वर्षातच राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त केला.

कांशीराम यांनी संघटन स्थापन करताना अनेक लोकप्रिय नारे दिले. ह्या नाऱ्यामधून कांशीराम यांचे राजकीय विचार प्रतिबिंबित होतात. कांशीरामांचे धार्मिक विचार, आंबेडकरवादी कांशीराम,कांशीराम एक स्त्रीवादी विचारवंत असे कांशीराम यांचे विविध राजकीय विचारांचा अभ्यास या प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे: कांशीराम आणि बहुजन समाज पार्टी -

"बहुजन हिताय बहुजन सुखाय" चा नारा देऊन कांशीराम यांनी बहुजन समाज पार्टीची स्थापना केली. देशातील वंचित,बहुजन समाजामध्ये राजकीय आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य बहुजन समाज पक्षाने केले. बहुजन समाज पार्टी ची स्थापना करण्यामध्ये कांशीराम यांचा राजकीय विचार तसेच निवडणूक हारणे, हारवणे आणि जिंकणे हे कांशीरामचे

निवडणूक राजकारण ह्याचा अभ्यास ह्या प्रकरणामध्ये करण्यात आला आहे.सोबतच राजकीय प्रचार सभा व त्या प्रचार सभेमधील कांशीराम यांचे भाषण यामधून त्यांच्या राजकीय विचारास अभ्यास करता येईल. बहुजन राजकारणाच्या हितामध्ये राजकीय आघाडी करण्याची व तोडण्याची कांशीराम यांची राजनीती, बहुजन समाज पार्टीच्या माध्यमातून कांशीराम यांनी निर्माण केलेले बहुजन समाजातील नेतृत्व, कांशीराम यांच्या उत्तरार्धात मायावतीची केंद्रीय भूमिका आणि मायावतीस मुख्यमंत्री बनवणे अश्या कांशीराम यांच्या विचाराशी संबंधित विविध मुद्द्यांचा अभ्यास या प्रकरणांमध्ये करण्यात येणार आहेत.

प्रकरण पाचवे: संसदेतील कांशीराम -

१९९१ साली उत्तर प्रदेशातील `इटावा लोकसभा` क्षेत्रातून कांशीराम पहिल्यांदा खासदार म्हणून निवडून गेले. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत पंजाब मधील `होशियारपूर लोकसभा` मतदारसंघातून कांशीराम पुन्हा खासदार म्हणून निवडून गेले. संसद सदस्य म्हणून कांशीराम यांनी संसदेत मांडलेली मते, वेगवेगळ्या चर्चेत घेतलेला सहभाग याच्या चिकित्सक अभ्यासातून कांशीराम यांचे राजकीय विचार अभ्यासता येतात.

प्रकरण सहावे: कांशीराम यांच्या विचाराने भारतीय राजकारणातील प्रभावित घटक-

कांशीराम यांच्या विचाराने प्रभावित होऊन नंतरच्या काळात अनेक नवनवीन पक्ष निर्माण झाले. तसेच कांशीराम यांचे संघटन कौशल्य, त्यांचा बहुजन विचार, त्यांच्या आरक्षणविषयी विचार इत्यादीच्या प्रभावाने भारतीय राजकारणास नवीन आयाम देण्याचं प्रयत्न केला आहे त्याचा सविस्तर अभ्यास ह्या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

टीप :-

वरील प्रमाणे शोध प्रबंधाचा प्राथमिक आराखडा असून आवश्यकता असल्यास काही बदल केला जाऊ शकतो.

संदर्भ सूची :-

१)अवचारे प्रा. दि.के. चोट नोट थेअरी आणि कांशीराम, अवधूत प्रकाशन, सोलापूर.१९९५, प्रथमावृत्ती.

२)आगाशे के.सि. कांशीराम आणि चम्मचळवळ, प्रेरणा प्रकाशन, पुणे २००१,प्रथमावृत्ती.

३) कसबे रावसाहेब (संपादक)- कांशीराम यांचे जीवनकार्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, पुणे विद्यापीठ, पुणे २००७.

४)कांबळे द.मा. कांशीराम पर्वाचा उदय, संकेत पब्लिकेशन, सोलापूर- २००२.प्रथमावृत्ती

५)कावळे पी.बी. कुशल संघटक कांशीराम, अक्षर प्रकाशन, बीड-२००५

६)कांबळी डॉ.स.भी. कांशीरामजींचा सामाजिक दृष्टीकोन, संज्ञा प्रकाशन, बीड-२००५.

७)केतकर हनी- कांशीराम आणि बहुजनवाद, पारिजात प्रकाशन, मुंबई २००९. प्रथमावृत्ती

८) गजभिये अशोक- समाज प्रवर्तक, बहुजन उद्धारक,मानवतावादी कांशीराम, सुयोग प्रकाशन कल्याण-२००६ प्रथमावृत्ती.

९) गायकवाड.सि.के. कांशीराम आणि महाराष्ट्र भूमी प्रकाशन, लातूर- २००७.

१०) चंगोले पी. एस. -शाहू व कांशीराम गुरु रविदास प्रकाशन, नागपूर- २००६.

११) जोशी. प्रा.र.पि. कैडर कैंप आणि कांशीराम, केतकी प्रकाशन, नागपूर, १९९९

१२) थोरात टी.टी.- कांशीराम आणि आव्हाने, सावली प्रकाशन, नागपूर- १९९१

१३) थोरात सी. पी. कांशीराम मनुवादापुढे आव्हान शिवम् प्रकाशन, पूणे- २००५

१४) दुधभाते गौ. के. डी. एस फोर आणि मायावतीचा उदय, शिवम् प्रकाशन, पुणे २०१०.

१५) नारनवरे डॉ. जी.एस. कांशीराम पर्याचा उदय, प्रांत पब्लिकेशन, चंद्रपूर- २००६

१६) पाटील के.सि. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि कांशीराम, शिवम् प्रकाशन, पुणे- २००६

१६) कांशीराम बामसेफ परिचय, श्वेत प्रकाशन, करोलबाग, नई दिल्ली- १९८२, प्रथम संस्करण

१७) काशीराम चमचा युग, समता प्रकासन, नागपूर-१९८२, प्रथम संस्करण

१८) कांशीराम आंबेडकर मेला ऑन व्हील, दि. १४ एप्रिल १९८० से १४ जून १९८०

१९)Mane Suresh- Revolution of Bahujan Samaj Party, It's Rise & Achievements, A.C. Publication,Thiruchy-2005.

संशोधक

विशाल आनंदराव वाहेवळ

एम.ए ,सेट (राज्यशास्त्र)

Email ID :- Vishalwahewal@gmail.com

मार्गदर्शक

डॉ. अविनाश पांचाळ

सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक

राज्यशास्त्र विभाग,

शारदा कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी